# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com


जा.क्र/सआस/कक्ष-१/आस्था-१/ ५०२ दि. २४ / ०९ / २०२४

संदर्भ :-1) शासन निर्णय क्र.अकंपा-1217/प्र.क्र.102/आठ, दि. 21 सप्टेंबर, 2017.

2) शासन निर्णय क्र.अकंपा-1220/प्र.क्र.167/का-8, दि. 06 जानेवारी, 2021.

3) मा. आयुक्त यांची ई-आफिस नं. 814434 दि. 23 / 09 /2024 रोजीची मान्यता.

### -:नियुक्ती आदेश:-

मा. महानगरपालिका ठराव क्र.104, दिनांक. 30/06/1983 तसेच मा.म.न.पा.ठराव क्र.139 दिनांक 23/09/1985 अन्वये विहित केलेल्या धोरणानुसार सोलापूर महानगरपालिका सेवेत असतांना, सेवक दिवंगत झाल्यास त्याचे पात्र वारसास शैक्षणिक पात्रतेस अनुसरुन अनुकंपा तत्त्वाखाली सेवेत सामावून घेणेबाबतचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. सदर धोरणाचे अनुषंगाने वरील संदर्भ क्र.1 व 2 चे शासन निर्णयास अनुसरुन, मा.म.न.पा.ठराव क्र.212, दि. 10/12/2004 अन्वये ठरविणेत आलेले धोरणानुसार व मा.न.पा. ठराव क्र.1790 दि. 20/02/2021 नुसार खालील तक्त्यामध्ये नमूद उमेदवारांची दिनांक 25 /09/2024 पासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाकडील रिक्त पदी प्रथमतः मूळ पगार हेच एकवट वेतन दोन वर्षाकरिता देय राहील. दोन वर्षानंतर नियुक्ती करण्यात आलेल्या पदाचे सातवे वेतन आयोगामधील वेतनस्तरानुसार+ महागाई भत्ता व इतर मान्य भत्तेयावर खालील शर्ती व अटीवर नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | पदनाम | कार्यालय | वेतनश्रेणी | एकवट वेतन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | नगमातरन्नुम अबुबकर सय्यद | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | मुख्य लेखापाल | S-6- 19900-63200 | 19900 |
| 2 | 6 | अझहरखान म.रफीक पठाण | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | शिक्षण विभाग | S-6- 19900-63200 | 19900 |
| 3 | 22 | साजिद रमजान शेख | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | विद्युत विभाग | S-6- 19900-63200 | 19900 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 23 | गणेश रामचंद्र काळे | भ.ज.(ब) | भ.ज.(ब) | कनिष्ठ श्रेणी लिपिक | सामान्य प्रशासन | S-6- 19900-3263200 | 19900 |
| 5 | 32 | भक्ती भिमराव बंडगर | भ.ज.(क) | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | संगणक | S-6- 19900-63200 | 19900 |
| 6 | 33 | विजयालक्ष्मी संजय जमादार | वि.मा.प्र. | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | सामान्य प्रशासन | S-6- 19900-63200 | 19900 |
| 7 | 34 | निखिल बादशाह पवार | वि.जा.(अ) | वि.जा.(अ) | कनिष्ठ श्रेणी लिपिक | कर संकलन | S-6- 19900-63200 | 19900 |
| 8 | 36 | रोहन संजय गवळी | इ.मा.व. | इ.मा.व. | कनिष्ठ श्रेणी लिपिक | कर संकलन | S-6- 19900-63200 | 19900 |
| 9 | 45 | समरीन अ. हमीद अन्सारी | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | प्रमुख लेखापाल | S-6- 19900-63200 | 19900 |
| 10 | 51 | स्वप्निल संजय टेके | विमाप्र | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | कर संकलन | S-6- 19900-63200 | 19900 |
| 11 | 53 | अभिषेक दिलीप पदकी | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | मुख्यलेखापाल | S-6- 19900-63200 | 19900 |
| 12 | 57 | आर्या भागवत इंगळे | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | संगणक | S-6- 19900-63200 | 19900 |
| 13 | 58 | रजत प्रदिप येवलेकर | इ.मा.व. | इ.मा.व. | कनिष्ठ श्रेणी लिपिक | कर संकलन | S-6- 19900-63200 | 19900 |
| 14 | 59 | श्रीनिवास जनार्दन सांवत | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | संगणक | S-6- 19900-63200 | 19900 |
| 15 | 65 | साकिब अन्वरहुसेन सय्यद | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | महात्मा गांधी प्राणी संग्रहालय | S-6- 19900-63200 | 19900 |
| 16 | 71 | पवन जर्नादन कन्ना | खुला | खुला | कनिष्ठ श्रेणी लिपिक | कर संकलन | S-6- 19900-63200 | 19900 |

**शर्ती व अटी**

1. उपरोक्त तक्त्यात नमूद उमेदवारांची नियुक्ती ही प्रथमतः दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी राहील. सदर कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्यांना कोणतीही नोटीस न देता कमी करणेत येईल.
2. नियुक्त उमेदवारांना दोन वर्षानंतर नियुक्ती करण्यात आलेल्या पदाचे सातवे वेतन आयोगामधील वेतनस्तरानुसार+ महागाई भत्ता व इतर व मान्य भत्ते लागू राहील.

3. त्यांनी नोकरीत रुजू झालेपासुन एक महिन्याच्या कालावधीत मा. मेडिकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका, यांचे शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र (फिजीकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे आवश्यक राहील.

4. त्यांना महानगरपालिकेचे सध्या अस्तित्वात असलेले नोकरी विषयक अथवा त्यानंतर वेळोवेळी अमलात येणारे नियम, पोटकानून, विनियम, स्थायी आदेश इत्यादी लागू राहतील.

5. ज्या उमेदवारांची नियुक्ती ही मागास प्रवर्गातून झालेली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती दिनांकापासून 2 महिन्याचा आत जातवैधता प्रमाणपत्र प्रशासनाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

6. ज्या उमेदवारांना महानगरपालिकेची नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी 2 महिन्यांची पूर्व नोटीस देणे आवश्यक आहे किंवा 2 महिन्याच्या मूळ पगाराइतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.

7. सदर उमेदवारांची नेमणूक ही संपूर्णतः हंगामी स्वरुपाची असल्याने, त्यांना कोणतेही कारण न दर्शविता नोकरीतून नोटीस न देता कमी करणेत येईल.

8. नियुक्तीचे ठिकाणी हजर होताना ते जर अन्य ठिकाणी नोकरीस असतील तर त्या संस्थेचा कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे आवश्यक आहे.

9. सदर उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेसंबंधी व इतर कागदपत्रे / प्रमाणपत्राबाबत सोलापूर महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे अथवा खोटी कागदपत्रे सादर केलेली आहेत असे यापुढे केव्हाही निदर्शनास आल्यास त्यांना तात्काळ नोकरीतून कमी करण्यात येईल.

10. **सदर नेमणूकीचे आज्ञापत्र मिळाल्यापासून 7 (सात) दिवसाचे आत सामान्य प्रशासन विभागाकडे रुजू व्हावे.** सदरचे आदेश मिळूनही ते सबळ कारणामुळे हजर राहू शकत नसतील व ती कारणे मा. आयुक्तांचे समाधान करुन शकत नसतील तर त्यांचे नाव प्रतिक्षायादीतून सेवकवर्ग निवड समितीच्या दि. 13.02.1980 चे मंजूर नियमानुसार कमी करण्यात येईल व त्यानंतर त्या पदावरील नेमणुकीबाबत त्यांचे कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

11. उपरोक्त नियुक्त उमेदवारास शासन निर्णय क्र.अंनियो-105/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 व शासन निर्णय क्र.अंनियो-2012/प्र.क्र.96/सेवा-4, दिनांक 27/08/2014 मधील तरतूदीनुसार राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (National Pension System) योजना लागू राहिल. याशिवाय शासनाकडून याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

१२. नियुक्ती पदावर हजर होताना शासन निर्णय दि.१ जुलै २००५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतूदीनुसार उमेदवारास लहान कुटुंबाचे

प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबत भविष्यात माहिती खोटी/चुकीची आढळून आलेस संबंधीतांना शासकीय सेवेतून तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकण्याचे संपूर्ण अधिकार हे नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

13. संबंधित सेवकाने शासनमान्य MS-CIT अथवा DOEACC संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय दिनांक. 21 सप्टेंबर, 2017 अन्वये संगणक ज्ञानाची अर्हता नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून 2 (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.
14. कनिष्ठ श्रेणी लिपीक या पदी नियुक्त सेवकांनी मराठी टंकलेखन परिक्षा 30 श.प्र.मि व इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सहा महिनेच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
15. पोलीस खात्याकडून वर्तणूकीचा दाखला 30 दिवसाचे आत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. उपरोक्त कालावधीत दाखला हजर न केल्यास आपली नियुक्ती रद्द्र करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
16. नियुक्त उमेदवारांने दोन वर्षाकरीता एकवट वेतनावर काम करणेस तयार असलेबाबत हमीपत्र सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.

(शीतल तेली- उगले, भा.प्र.से)
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका**

**प्रति,**

संबधित उमेदवार व संबधित विभाग

**प्रत**

1. मुख्यलेखापाल विभाग
2. अंतर्गत लेखापरिक्षक
3. सेवापुस्तक विभाग, सा.प्र.विभाग
4. मुख्यलेखापरिक्षक विभाग
5. संगणक विभाग
6. स्थळ प्रत